# अमिताचा संदेश

"चला उतरा", ड्रायव्हरने आरोळी ठोकली. गप्पात मग्न असलेल्या बायकांचे थोडा वेळ त्याच्याकडे लक्षच गेले नाही. पण इतका वेळ गचके खात खड्डे चुकवत चाललेली बस पूर्ण बंद पडली आहे, हे जाणवल्यावर त्या एकेक करून भानावर आल्या.

"अय्या, आपण पोचलो देखील?" असे उद्गार काढत रती व तिच्या मैत्रिणी गाडीतून उतरल्या. खंडाळ्याच्या एका पॉश हॉटेलमध्ये त्यांनी राहाण्याची व्यवस्था केली होती. त्यांच्यापैकी रती सोडल्यास बहुतेकींचा पंचतारांकित हॉटेलमध्ये शिरण्याचा पहिलाच अनुभव होता. त्यामुळे "अय्या, किती मस्त. Wow" अशा प्रकारचे चित्कार काढत त्या लॉबीत प्रवेश करत्या झाल्या.

चेक-इनचे काम झाल्यावर सर्वजणी लॉबीत जमल्या. "आता सर्वांनी अर्ध्या तासात तयार होऊन खाली यायचे आहे", रतीने सर्वांना बजावले, "इथे आपण झोपा काढायला नाही आलो, बरोबर?"

"इथे एकटीलाच झोपावे लागेल काय गं? का सोबतीला कुणी मिळण्याची सोय आहे? नाही, फाईव-स्टार मध्ये हवे ते मिळते म्हणून विचारले" सुजाता म्हणाली.

सर्वजणी अवाक् होऊन सुजाताकडे पाहात राहिल्या. "सुजाता, तू?"

सुजाता या ग्रूपमध्ये सर्वात सोज्वळ म्हणता येईल अशी होती. परपुरूषाची सावलीदेखील वर्ज्य असल्यासारखी ती नेहमी वागे. त्यामुळे ती असे काही बोलेल हे कुणाला स्वप्नातदेखील वाटले नसते. हां, म्हणजे वसुंधरा असे बोलली असती तर कुणालाच आश्चर्य वाटले नसते, कारण वसुंधरा ही तिच्या मैत्रिणींच्या मते नुसतीच "वसू" नसून एकदम "वासू" होती, आणि तिला त्या तशीच हाक मारीत. अर्थात तिची वासुगिरी गप्पा मारण्यापुरतीच होती. या कंपूतले कुणीच गप्पांच्या पुढे गेले नव्हते. त्यांच्या एकमेकांबद्दलच्या माहितीनुसार.

"अगं, गंमत केली! मला थोडीच गरज आहे? आपल्या वासूसाठी म्हणाले मी." सुजाताने सारवासारव केली. पण बाण केव्हाच सुटला होता. तिचे "सोज्वळपद" आता सुजाताने गमावले होते!

ठरल्याप्रमाणे अर्ध्या तासात सर्वजणी लॉबीतल्या प्रशस्त कोचांवर येऊन बसल्या. लगेचच एक तरूण मुलगा  सर्वांसाठी शीतपेयांचा ट्रे घेऊन आला. कोकम, लिंबू, पेप्सी अशी वेगवेगळी पेयं घेऊन सर्व बायका छान घुटके घेत कोचांवर टेकल्या. इतरांसाठी कायम काहीना काही तरी खाण्या-पिण्याची व्यवस्था करण्यात आयुष्य गेलेल्या या बायकांना हे असे आरामात बसून पेयांचा आस्वाद घेणे खूपच अद्भुत वाटले.

"कस्टमरला एक शब्दही न बोलायला लावता त्याच्या इच्छा पुऱ्या करीत राहाणे हे या पंचतारांकित हॉटेलांचे वैशिष्ट्य बरं का." रतीने माहिती पुरवली.

तिचे वाक्य संपण्याच्या आधीच अजून एकजण भजी, डाळवडे, अशा चीजवस्तूंनी भरलेला ट्रे घेऊन आला. रतीच्या सर्व मैत्रिणींनी "हं, खरे आहे!" अशा अर्थाचे सुस्कारे टाकले, व त्या ट्रेवर झडप मारली.

सर्वांचा जठरात्मा सुस्तावल्यावर रती त्यांना घेऊन बाहेर बागेत आली. तिथे सर्वजणी मऊशार हिरवळीवर बसल्या. कुणीही त्यांना हटकले नाही. "हिरवळीवर बसणे allowed नसते तर त्यांनी कुंपण घालून येणेच अशक्य केले असते," रतीने माहिती पुरवली.

हळूहळू मैत्रिणींच्या गप्पा रंगू लागल्या. या सर्व जणी खरे तर पाच वर्षांच्याच मैत्रिणी. सगळ्या संसारी स्त्रिया. वेगवेगळ्या कारणांनी त्यांची एकमेकीशी ओळख होत गेली. पण त्यांचे आता एव्हढे मेतकूट जमले होते की काही विचारायची सोय नाही. कुठलाही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. सर्व सुखदुःखे त्या मोकळेपणी बोलून दाखवत. अगदी एखाद्या रात्री नवऱ्याने जास्त त्रास दिला तर तेही तिखटमीठ लावून त्या एकमेकीला सांगत!

या सगळ्यांचा आवडता विषय म्हणजे पुरूषजात कशी हरामखोर आहे! रती सोडल्यास सगळ्याजणींचे यावर एकमत होते. कुणीच तिच्या नवऱ्याविषयी खूष नव्हती. हा रागीटच आहे, हा कंजुष आहे, ह्याला कसली आवडच नाही, हा नुस्ता टी व्ही बघत बसतो, हा आला की साडीलाच हात घालतो, एक ना अनेक.

हा विषय निघाला की रती मात्र गप्प बसून स्मित हास्य करीत राहायची. तिचे म्हणणे असे असायचे की, "एक-दोन पुरूषांमुळे सर्व जमातीला वाईट ठरवणे बरोबर नाही."

आज रतीला यावरून खोदायचे सर्व जणींनी ठरवले होते. "काय गं रती, तुला काय एव्हढा चांगला अनुभव आहे, सांग बघू." विनीता तावातावाने म्हणाली. विनीताला स्वतःच्या नवऱ्याची चीड तर होतीच, शिवाय असला नवरा गळ्यात बांधल्याबद्दल तिला तिच्या आईवडलांविषयीही भयंकर राग होता.

रती नेहमीप्रमाणे गूढ हसली आणि म्हणाली, "तुम्ही सगळ्या असं बोलता कारण तुम्ही प्रेम, मैत्री वगैरेच्या भुलभुलैयात अडकलेल्या आहात. पुरूष एकच गोष्ट खात्रीलायक देऊ शकतो आणि ती म्हणजे सेक्सचे सुख. त्याच्याकडून बाकी काहीही मिळणे ही नशीबाची व दुर्मिळ बाब आहे."

सगळ्या स्तंभित होऊन रतीकडे पाहात राहिल्या. रती आज फारच बिनधास्त मूडमध्ये होती.

मैत्रिणींची काहीच प्रतिक्रिया नाही हे पाहिल्यावर रती पुढे म्हणाली, "मी असं करते, तुम्हाला एक गोष्ट सांगते. एका मुलीची."

सर्वजणी लगेच सावरून बसल्या व मंत्रमुग्ध होऊन रतीकडे बघत राहिल्या.

रतीने गोष्ट सुरू केली.

"ही गोष्ट आहे अमिता नावाच्या कॉलेजमधल्या एका मध्यमवर्गीय मुलीची. मी सांगताना थोडक्यात सांगणार आहे. मधले डिटेल्स तुम्ही समजून घ्यायचे. ओके?"

सर्वजणींनी मान डोलावली.

"तर नेहमीप्रमाणे अमिता वर्गात आली. मराठीचा क्लास होता. प्राध्यापक अजून यायचे होते. मुलांचा नेहमीप्रमाणे दंगा धुडगूस चालू होता. सुंदर मुलींचे लक्ष वेधून घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. स्त्री-पुरूष यांच्यातले आकर्षण हा प्रकार काय असतो ते आता अमिताला चांगलेच माहित झाले होते. पूर्वी सिनेमातली काही दृश्ये पाहून ती नाक मुरडायची. काय हा घाणेरडेपणा आहे, असे तिला वाटायचे. पण आता तीच दृश्ये पाहून तिच्या शरीरात अनामिक संवेदना निर्माण होत. त्या दृश्यातल्या स्त्रीच्या जागी आपण आहोत अशी ती कल्पना करू लागे. मग तिच्या शरीराची तगमग अजून वाढे. असे असले तरी तिला वर्गातल्या कुठल्याच मुलाविषयी आकर्षण वाटत नव्हते. आपले शरीर त्यातल्या कुणाकडे हवाली करण्याची कल्पना तिला करवत नव्हती. निमूटपणे शरीरातील विचित्र संवेदना सहन करत बसण्याशिवाय तिला काही पर्याय नव्हता. आपल्या विश्वात ती अशाप्रकारे हरवून बसली असताना तिला अचानक जाणवले की वर्ग शांत झाला आहे. मान वर करून तिने पाहिले तेव्हा तिला एक उंचापुरा पुरूष फळ्यापाशी उभा

असलेला दिसला. तो विद्यार्थ्यांपैकी नक्कीच नव्हता. पण तो प्राध्यापकही वाटत नव्हता. त्याचे केस अजून काळे कुळकुळीत होते, पण ऐन तारूण्यात तो नक्कीच नव्हता. त्याची भेदक नजर साऱ्या वर्गावरून फिरली. अमिताला पाहताच त्याची नजर थबकल्यासारखी वाटली. तिच्याकडे पाहात असतानाच त्याच्या ओठांवर एक मिश्कील स्मित उमटले, व तो सर्वांना उद्देशून म्हणाला, "काय मंडळी, मराठीत गप्पा मारायच्या का?" त्याचा खणखणीत आवाज कानी पडल्यावर अमिताच्या शरीरातून एक अनामिक सुखद संवेदना वाहात गेली.

तो खरोखरच मराठीचा प्राध्यापक होता. "माझे नाव अजय, आणि तुम्ही मला अजयच म्हणायचे बरं का. सर बिर नाही." असे तो वर्गाला उद्देशून म्हणाला. त्याच्या शिकवण्यात एक सहजपणा होता. जणू तो गप्पाच मारत होता. मुले आणि मुली दोघांकडे तो सारखेच लक्ष देत होता. बाकी सर्व प्राध्यापक वर्गात जणू मुली नाहीतच अशा थाटात वागत. सर्व लक्ष ते मुलांच्यावर केंद्रीत करत. तसे अजयचे नव्हते. तो मुले आणि मुली दोघांशी सारख्याच खेळकरपणे बोलत होता. शिकवताना तो वर्गभर फिरत फिरत शिकवत होता. मध्येच तो एखाद्याच्या बाकाजवळ थांबे, त्याच्याकडे किंवा तिच्याकडे पाहून एक गोड स्मित करे, आणि परत चालू लागे. सर्व वर्गाला अजय खूपच आवडला.

क्लास संपल्यावर सर्व मुले उठून गेली, पण अमिता तिच्या जागेवर खिळून राहिली. एखादे स्वप्न प्रत्यक्षात उतरल्यावर जसे वाटते तसे तिला वाटत होते. वर्गात फिरताना एकदा अजय तिच्याजवळ येऊन थांबला होता. त्याच्या शरीराचा पुरूषी गंध तिच्या नाकात शिरताच ती अस्वस्थ झाली होती. तिच्या छातीतली धडधड वाढली. नकळत ती उठून उभी राहिली, पण तिच्या गुडघ्यांना कंप सुटला. अजयने स्मित केल्यावर तीही कशीबशी हसली आणि पटकन खाली बसली. अजयला तिची ही अवस्था कळली की काय कुणास ठाऊक, पण त्यानंतर तो बऱ्याचदा तिच्याकडे नजर टाकत राहिला.

एके दिवशी क्लासनंतर अजयने अमिताला आपल्या घरी चहाचे आमंत्रण दिले. काहीही आढेवेढे न घेता ती तयार झाली. तिने अबोली रंगाचा ड्रेस घातला होता. अजय तिच्याकडे मंत्रमुग्ध होऊन पहातच राहिला. "किती सुंदर आहेस गं तू," असा उद्गार नकळत त्याच्या तोंडातून निघून गेला. अमिता लाजली, पण धीटपणे ती अजयच्या नजरेला नजर भिडवत स्मित करत राहिली. "ये, बस ना," अजय सोफ्याकडे बोट दाखवत म्हणाला. अमिता एका कोपऱ्यात बसली, आणि अजय आपल्याजवळ येऊन बसेल अशी मनोमन प्रार्थना करीत राहिली. आणि तसेच झाले. अजय किचन मधून दोन चहाचे कप घेऊन आला. सोफ्यासमोरच्या टेबलावर ते कप ठेवून तो तिच्याजवळ बसला. त्याच्या शरीराचा तो वेड लावणारा गंध नाकात शिरताच अमिता पुन्हा सैरभैर झाली. अजयने काहीही न बोलता तिच्या खांद्यावर हात ठेवला. अमिताच्या शरीरातून वीज चमकावी तशा संवेदना निर्माण झाल्या. तिला काय करावे समजेना. अजय तिच्या कानात हळूच बोलला, "तू मला खूप आवडलीस. तुझ्यात आणि माझ्यात एक अनोखे आकर्षण आहे, जे मला पहिल्याच दिवशी जाणवले. हे बघ." असे म्हणून त्याने तिचा हात स्वतःच्या हृदयावर ठेवला. तिलाही त्याच्या छातीतली धडधड जाणवली. अजयने अमिताला जवळ ओढले व तिच्या दाट केसात त्याने आपला चेहरा लपवला व तिच्या केसांचा गंध एक दीर्घ श्वास घेऊन छातीत भरून घेतला. त्याच्या राकट हातांचा स्पर्श होताच अमिता लोण्यासारखी विरघळली. तिचे ओठ कोरडे पडले. अजयने तिच्या ओठांवर ओठ ठेवले. तिचे मऊ आणि उष्ण ओठ त्याने आपल्या ओठांखाली चिरडले. तिनेही आवेगाने त्याला प्रतिसाद दिला. दोघे सोफ्यावर कधी लवंडले त्यांना कळलेच नाही. आता दोघांचेही भान हरपले होते. अजय अमिताच्या शरीराची चुंबने घेऊ लागला, आणि त्याच्या प्रत्येक चुंबनाबरोबर अमिता अधिकाधिक धापा टाकू लागली."

रती थांबली व एखाद्या कीर्तनकाराने आपल्या भक्तगणाकडे प्रेमार्द्र नजरेने पाहावे तसे तिने आपल्या मैत्रींणींकडे पाहिले. सगळ्या भान विसरून तिच्याकडे पाहात होत्या. सुजाता तर आ वासून बघत होती. "मला वाटते तुम्हाला झेपणार नाही ही गोष्ट. थांबू का इथेच?" रतीने मिश्कीलपणे विचारले. सगळ्या जणी एव्हढ्या वैतागल्या की सरसावून तिला मारायलाच उठल्या. "बरं बरं, सांगते पुढचं", रती म्हणाली.

"हां तर कुठे होतो आपण? हां, अजय आणि अमिता सोफ्यावर लवंडले होते. अजयने तिच्या नकळत तिच्या टॉपची बटने सोडली. अमिताने त्याला विरोध करायचा खोटा आणि असफल प्रयत्न केला. त्याच्या शक्तीपुढे तिचे काहीच चालले नाही. तिचा टॉप दूर करून अजयने तिचे उबदार उरोज कुरवाळले. त्याच्या त्या खरखरीत पुरूषी हातांच्या स्पर्शाने तिचे सर्वांग थरथरले. अजयने अंगठा आणि बोटांनी तिची मऊ छाती कुसकरली. त्याच्या स्पर्शामुळे अमिताचे सर्वांग ताठरले. अमिता अजूनच त्याला बिलगली आणि त्याच्या ओठांना प्रतिसाद देऊ लागली. हा सर्वच अनुभव तिला नवीन होता. पुरूषाच्या मिठीत एवढे सुख असते याची तिला कल्पनाही नव्हती. तिच्या शरीरातली प्रत्येक पेशी अजयच्या स्पर्शासाठी धडपडू लागली. अजय तिच्या कानात पुन्हा पुटपुटला, "मला तुला खूप सुख द्यायचे आहे, तुझे हे सुंदर शरीर त्या सुखासाठी आसुसले आहे." त्याचे म्हणणे खरे होते. आतापर्यंत

आपण केवढ्या आनंदाला मुकलो होतो, याची अमिताला जाणीव झाली होती. तिच्या मनात खोल कुठेतरी भीती व संकोच होता, तरी ती हे नवीन सुख उपभोगायला आतुर झाली होती. अजयने आपला हल्ला चालूच ठेवला. त्याचे हात आता तिच्या छातीवरून घरंगळत तिच्या पोटावर आले. तिची ती कोवळी त्वचा त्याने प्रेमभराने कुरवाळली, आणि अलगद आपली बोटे हळुहळू खाली सरकवली. यावेळी मात्र अमिताने त्याला थांबवले. अजयने शक्तीचा वापर न करता तिचा विरोध मान्य केला. त्याने आपला पवित्रा बदलला. तिच्या उष्ण ओठांचे पुन्हा एकदा दीर्घ चुंबन घेऊन तो तिच्या कानात पुटपुटला, "माझ्यावर विश्वास ठेव, मी तुला काहीही इजा करणार नाही." हे ऐकल्यावर अमिताने एक स्मित केले. तिचा अजयवर केव्हाच विश्वास बसला होता. त्याच्याकडून आपल्याला सुखच मिळणार आहे असा विश्वास. त्याच्या जवळ सरकून ती त्याला बिलगली व तिने त्याच्या केसातून बोटे फिरवली. त्याच्या ओठांना प्रतिसाद देत तिने त्याचे चुंबन घेतले. एव्हाना तिच्या अंगावरचे कपडे अस्ताव्यस्त झाले होते. पण तिला त्याचे भान नव्हते आणि पर्वाही नव्हती.

अजयने वेळ न दवडता तिच्या गुडघ्यावर उजवा हात ठेवून हळूवारपणे तिच्या मांडीकडे सरकवला. मांडीच्या आतल्या बाजूला बोटे सरकवून त्याने तिची मांडी दाबली आणि तिच्या मांसल भागात बोटे रूतवली. आता अमिताने त्याला विरोध केला नाही, कारण ती विरोध करण्याच्या पलीकडे गेली होती. तिच्या ओटीपोटाखाली आता वादळ सुरू झाले होते. मांड्यांची थरथर वाढली होती. जसजसे अजयचे हात वरवर सरकू लागले तसतसे अमिता कण्हू लागली, तिची छाती वरखाली धपापू लागली. एखाद्या कलाकाराप्रमाणे अजयची बोटे तिच्या शरीरातून संगीत निर्माण करीत होती. आपल्या शरीरात इतक्या संवेदनशील जागा आहेत याची अमिताला इतके दिवस जाणीवही नव्हती. अजय मात्र एखाद्या तरबेज वादकासारखा बोटांनी आणि ओठांनी तिच्या शरीरातील तारा छेडत होता. एक-दोन मिनिटेच काय ती अजयची बोटे फिरत होती, पण एखादे धरण फुटून पाण्याचा लोंढा यावा तशी अमिताची अवस्था झाली. बराच वेळ ती निपचित पडून त्या स्वर्गीय सुखाचा अनुभव घेत राहिली. शरीरसुखाचा हा तिचा पहिला अनुभव होता."

एव्हढे बोलून रती गप्प बसली.

गोष्ट संपली आहे हे सर्वजणींना कळले होते. तरीपण न राहवून सुजाता म्हणाली, "अगं पण पुढे काय झाले. त्यांचा प्रेमविवाह झाला का? का वयातल्या फरकामुळे नाही जमले?"

"हेच चुकते तुम्हा सर्वांचे. पुढे काहीही झाले नाही. अजयचे कपडे तसेच राहिले त्याच्या अंगावरच. तो तसाच तिच्याजवळ ती शांत होईपर्यंत गपचिप पडून राहिला. त्याने तिला परत पूर्ववत तयार व्हायला मदत केली आणि एक कप कॉफी पाजून तिला बाय-बाय केले."

"अजयची एका वर्षातच दुसऱ्या गावी बदली झाली. ते पुन्हा एकदोनदा भेटलेही असतील. पण अमिताच्या दृष्टीने त्याला काहीच महत्त्व नव्हते." रती एखाद्या प्रवचनकाराच्या आविर्भावात म्हणाली.

"अगं म्हणजे काय?" कासावीस होऊन वसू उद्गारली.

"अशा कितीतरी सेक्सी गोष्टी मी वाचल्या आहेत नेटवर", सुजाता म्हणाली. "सोज्वळ" सुजाताच्या अशा बोलण्याचे आता कुणालाच आश्चर्य वाटले नाही. किंबहुना अमिताची गोष्ट ऐकून सगळ्याच एव्हढ्या मोकळ्या झाल्या होत्या की न्यूड बीचवर गेल्यावर नग्नतेची सवय होऊन मोकळे वाटावे तशी त्यांची विचारप्रक्रिया झाली होती.

"मग या गोष्टीत एव्हढे काय आहे विशेष?" सुजाताने तिची शंका उपस्थित केली.

"या गोष्टीत दोन विशेष बाबी आहेत." रतीने प्रवचन चालू ठेवले. "एक म्हणजे, ही गोष्ट सत्यकथा आहे."

सगळ्यांचे डोळे विस्फारले. " रती?" सगळ्या एका सुरात ओरडल्या.

"दुसरे म्हणजे, अमिताचेही तुमच्यासारखेच अरेंज्ड मॅरेज झाले. पण तिला पुरूषजमातीविषयी द्वेष नाही. कारण .."

"हो कळले, कळले", वसूने रतीला थांबवले.

"पण या गोष्टीचे आमच्यासाठी तात्पर्य काय?" इतका वेळ शांत असलेली चंदना म्हणाली.

"तात्पर्य काहीच नाही. मला वाटते प्रत्येक मुलीचे सेक्स लाईफ खरे म्हणजे अमितासारखे सुरू व्हायला पाहिजे. पण तसे न होता ते बाजारात खरेदी केलेल्या नवऱ्याच्या संगतीत सुरू होते आणि संपते. कारण वय वर्षे सोळा आणि लग्न यामधला सगळा वेळ सर्व मुली निव्वळ मेकप करण्यात वाया घालवतात. प्रेम, मैत्री यांची शारीरिक सुखाशी गफलत करतात." रतीने सगळ्यांना सुनावले.

"तुम्ही सगळ्या जणी तुमच्या नवऱ्यांचा द्वेष जरूर करा. पण सगळ्या पुरूषजमातीचा करू नका. संवेदनशील असणारे, स्त्रीच्या सुखाचा विचार करणारे, असे पुरूषही असतात."

"आता तुमच्या बाबतीत बोलायचे झाले तर ... खरं म्हणजे वेळ निघून गेली आहे. पण हौस असेल तर अजूनही शोध घ्यायला काहीच हरकत नाही!"

सुजाता धडपडत उठली, "मी निघतेच कशी शोध घ्यायला". सुजाताचे वाक्य ऐकून सगळ्या खदाखदा हसू लागल्या. योगायोगाने त्याच क्षणी मघाचा तरूण मुलगा त्यांच्या मागे येऊन उभा राहिला व अदबीने म्हणाला, "मॅम, जेवण तयार आहे". हसतच सगळ्या बायका त्या मुलाकडे अर्थपूर्ण नजरेने पाहू लागल्या. त्यांचा रागरंग पाहून तो मुलगा बिचारा बावरला आणि त्याने तिथून पळ काढला!

*Author: Abhay B. Joshi (abjoshi@yahoo.com)*
*September 2010*